## =: प्रेसनोट दिनांक- ११/११/२०२१ :=

**आरोपी लोकसेवक श्री रमेश दगडू राठोड, वय ४३, महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय, हातकणंगले ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, वर्ग -३, रा. कावळानाका शासकीय वसाहत रूम नं.१०, एम बिल्डींग, कोल्हापूर, मूळ शिवाजीनगर, केगांव ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.....**

---

तक्रारदार हे आळते गावी शेती हा व्यवसाय करतात. त्यांनी व्यवसायाकरीता आळते गावी गट नं.२०३२ मधील २ गुंठे जागा शरीफा सलीम मुजावर यांचेकडून खरेदी केली आहे. तक्रारदार यांनी सदर जमीण बिगरशेती करणेकरीता मा.उपविभागीय अधिकारी, इचलकरंजी यांचेकडे रितसर अर्ज केला होता. सदरचा अर्ज चौकशीकरीता तहसिलदार कार्यालय, हातकणंगले यांचेकडे पाठविणेत आला होता. याबाबत तक्रारदार यांनी तहसिलदार कार्यालय, हातकणंगले कार्यालयातील श्री रमेश राठोड, महसुल सहायक यांची भेट घेतली असता त्यांनी सदरची जमीण वर्ग-२ मधुन वर्ग-१ करणेच्या प्रस्तावावर इनामी जमीण नसलेबाबतचा शेरा देणेकरीता तक्रारदार यांचेकडे ३,०००/-रू लाचेची मागणी केली.

त्याअनुषंगाने तक्रारदार यांची तहसिलदार कार्यालय, हातकणंगले येथील श्री रमेश राठोड यांनी ३,०००/- रू. लाचेची मागणी केलेबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूरकडे प्राप्त झाली होती.

तक्रारीप्रमाणे दि.११/११/२०२१ रोजी पडताळणी केली असता तहसिलदार कार्यालय, हातकणंगले येथील श्री रमेश राठोड यांनी ३,०००/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती २,५००/-रू लाचेची मागणी करून ती लाच रक्कम तक्रारदार यांना घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झालेने त्यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित केली असता, दिनांक ११/११/२०२१ रोजी अभिलेख कक्ष, जुने तहसिलदार कार्यालय, हातकणंगले येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांची जमीण वर्ग-२ मधुन वर्ग-१ करणेच्या प्रस्तावावर इनामी जमीण नसलेबाबतचा शेरा देणेकरीता तक्रारदार यांचेकडून २,५००/- रू. लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक श्री रमेश दगडू राठोड, वय ४३, महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय, हातकणंगले ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर, वर्ग -३, रा. कावळानाका शासकीय वसाहत रूम नं.१०, एम बिल्डींग, कोल्हापूर, मूळ शिवाजीनगर, केगांव ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर यांचेविरूध्द हातकणंगले पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री. सुहास नाडगौंडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार श्री.सतिश मोरे, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सफौ. संजीव बंबरगेकर, पो.ना./१४८० सुनिल घोसाळकर, पो.ना./१ नवनाथ कदम, पो.ना./२०८७ कृष्णात पाटील, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner